मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अडीच लाख मालमत्ता कर कक्षेत

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा 300 कोटींचा महसूल वाढणार : सर्वेक्षणात नोंद नसलेल्या आणि वापरात बदल झालेल्या मालमत्ता आढळून आल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात शहरात दोन लाख ५५ हजार नोंद नसलेल्या आणि वापरात बदल झालेल्या मालमत्ता आढळून आल्या आहेत. या मालमत्ता करकक्षेत आणण्यात येणार असल्याने महापालिकेच्या तिजोरीत दर वर्षी ३०० कोटी रुपयांची भर पडणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात सहा लाख ३२ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. मात्र, त्यानंतरही शहरात अनेक निवासी व बिगरनिवासी मालमत्तांची महापालिकेच्या करसंकलन विभागाकडे नोंदणी नव्हती. त्यामुळे महापालिकेचे दर वर्षी कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न बुडत होते. नोंद नसलेल्या मालमत्ता शोधून



काढण्यासाठी महापालिकेने प्रत्यक्ष आणि ड्रोनद्वारे सर्व मालमत्ता आणि मोकळ्या जागांचे सर्वेक्षण केले. करसंकलन विभागाने शहरात १४८ गट तयार केले आहेत. त्यानुसार प्रत्येक इमारत, घर, मोकळी जागा यांना क्रमांक देण्यात आले आहेत. सर्वेक्षणात दोन लाख ५५ हजार नवीन मालमत्ता आढळून आल्या आहेत. सध्याच्या आणि सर्वेक्षणात आढळलेल्या नवीन अशा सुमारे आठ लाख ८७ हजार मालमत्ता नोंदणीकृत होणार आहेत. यातून महापालिकेला मोठ्या प्रमाणात महसूल मिळणार आहे.

रेडझोन हद्दीतील आणि झोपडपट्टी या दाट लोकवस्तीमधील मालमत्तांना क्रमांक देण्यात येत आहेत. सर्वेक्षणात आढळलेल्या, नोंद नसलेल्या मालमत्तांना कर लागू करण्याची प्रक्रिया सुरू आहे. वापरात बदल आणि वाढीव बांधकाम केले असल्यास त्यानुसार कर आकारला जात आहे. सर्वेक्षणात तब्बल दोन लाख ५५ हजार नोंद नसलेल्या मालमत्ता आढळून आल्या आहेत. त्यात निवासी मालमत्तांची संख्या सर्वाधिक आहे. त्या मालमत्तांना कर लागू केल्यानंतर महापालिकेचे उत्पन्न दर वर्षी तब्बल ३०० कोटींनी वाढणार आहे. त्यातून महापालिका तिजोरीत भर पडणार आहे.

### आठ लाख मालमत्ता नोंदणीकृत होणार

» याबाबत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे म्हणाले, की ड्रोनच्या साहाय्याने मालमत्ता सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. आत्तापर्यंतच्या सर्वेक्षणात दोन लाख ५५ हजार नवीन मालमत्ता आढळून आल्या आहेत. सध्याच्या आणि सर्वेक्षणात आढळलेल्या नवीन अशा सुमारे आठ लाख ८७ हजार मालमत्ता नोंदणीकृत होणार आहेत. यातून महापालिकेला मोठ्या प्रमाणात महसूल मिळणार आहे.

# महापालिका हद्दीत क्षेत्रीय कार्यालयनिहाय 'नो युवर पोलींग स्टेशन' कक्ष सुरु

## मतदारांची नावे, केंद्रे शोधण्यास होणार मदत, आठ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत केली स्थापना

**पिंपरी | प्रतिनिधी**

मतदार यादीत नाव आणि मतदान केंद्र शोधता यावे तसेच अन्य शंकाचे निरसन करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत क्षेत्रीय कार्यालयनिहाय 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या-'नो युवर पोलींग स्टेशन' कक्षाची स्थापना करण्यात आली आहे, अशी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली आहे.




महापालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयात नियंत्रण अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र 'नो युवर पोलींग स्टेशन' कक्षा स्थापन करण्यात आले असून कक्षाचे कामकाज कार्यालयीन मतदान प्रक्रिया संपेपर्यंत सुरू राहील. 'अ': भेळ चौक, निगडी प्राधिकरण, नियंत्रण अधिकारी- शितल शिंदे, कर्मचारी- माया जाधव, योगेश भांगले, क्षेत्रीय कार्यालय 'ब': लिंकरोड, एल्प्रो मॉल जवळ, चिंचवड, नियंत्रण अधिकारी- अमित पंडीत, कर्मचारी- अवण्णा कोळी, पल्लवी बेलसरे, क्षेत्रीय कार्यालय 'क': नेहरूनगर,भोसरी, नियंत्रण अधिकारी- तानाजी नरळे, कर्मचारी- माधवी चौगुले, शुभांगी साळी, क्षेत्रीय कार्यालय 'ड' औंध-रावेत बीआरटी रोड, रहाटणी, नियंत्रण अधिकारी- श्रीकांत कोळप, कर्मचारी- बाबासाहेब हिवराळे, श्रद्धा शुक्ला यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

क्षेत्रीय कार्यालय 'ई' पत्ता ग्रोथ लॅब बिल्डींग, पांजरपोळसमोर, भोसरीसाठी नियंत्रण अधिकारी-राजेश आगळे, कर्मचारी- शितल थोरात, गोविंद पखाले, क्षेत्रीय कार्यालय 'फ' लोकमान्य टिळक चौक, निगडी, नियंत्रण अधिकारी- सिताराम बहुरे, कर्मचारी- रमा बहिरवाडे, शेख आशु, क्षेत्रीय कार्यालय 'ग' दिलिप वेंगसरकर क्रिकेट ॲकेडमी, थेरगाव, नियंत्रण अधिकारी-किशोर ननवरे, कर्मचारी-सुमेध कांबळे, आकाश आगळे, क्षेत्रीय कार्यालय 'ह' महिला आयटीआय, कासारवाडी, नियंत्रण अधिकारी-उमेश ढाकणे, कर्मचारी-पुकराज शिंदे, समता ओंकार यांची नियंत्रण अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# फटाक्यांमुळे दहा ठिकाणी आगीच्या घटना

## सुदैवाने या घटनांमध्ये कोणतीही जिवीतहानी झाली नाही.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी – चिंचवडमध्ये गुरूवारी एकाच दिवशी दहा ठिकाणी फटाक्यांमुळे आगीच्या घटना घडल्या. त्यामध्ये कासारवाडी येथील सरिता संगम गृहनिर्माण सोसायटीतील तिसऱ्या मजल्यावरील सदनिकेला मोठी आग लागली. यात घरगुती साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. सुदैवाने या घटनांमध्ये कोणतीही जिवीतहानी झाली नाही.

वाकड येथील पार्कस्ट्रीट सोसायटी, कस्पटेवस्ती, नंददिप सोसायटी, चिंचवड येथील एम्पायर इस्टेट, वडमुखवाडी येथील जेनीनी सोसायटी, पिंपळेसौदागर येथील निसर्ग मान सोसायटी, फुगेवाडी – कुंदननगर येथील



सँडविक कंपनीसमोर, दिघी-आळंदी रोडवरील नानाश्री मंगल कार्यालय आणि सांगवी येथील कृष्णा चौकात गुरूवारी एकाच दिवशी या आगीच्या घटना घडल्या आहेत. सायंकाळी पाच ते रात्री बारा या वेळेत आगीच्या घटना घडल्या आहेत. या घटनांची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविले. कासारवाडी येथील सरिता संगम सोसायटीतील तिसऱ्या मजल्यावरील सदनिकेच्या बाल्कनीत बाहेरून फटाका पडल्याने आग लागली. सुदैवाने आगीच्या एकाही घटनांमध्ये कोणतीही जिवीतहानी झालेली नाही.

# पर्वतीमध्ये 'सांगली पॅटर्न'ची धास्ती?

## मतदार संघात ठिकठिकाणी 'यंदा पर्वतीत सांगली पॅटर्न' अशा आशयाचे फलक लावण्यात आले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यभरात उमेदवारी न मिळालेल्या नाराजांनी बंडखोरी करण्यासाठी दंड थोपटले आहेत. अनेकांनी तर आपापल्या मतदार संघात 'सांगली पॅटर्न' राबविण्याचा निर्धार केला आहे. पुण्यातील 'पर्वती' मतदार संघात देखील 'सांगली पॅटर्न'ची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. मतदार संघात ठिकठिकाणी 'यंदा पर्वतीत सांगली पॅटर्न' अशा आशयाचे फलक लावण्यात आले आहेत. या फलकांची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली असून हे फलक 'महायुती' आणि 'महाविकास आघाडी' यांच्यातील नेमके कोणी लावले याबाबत तर्कवितर्क लढविले जात आहेत.

पर्वती विधानसभा मतदारसंघामध्ये सध्या भाजपाच्या माधुरी मिसाळ या आमदार आहेत. त्या सलग तीन वेळा निवडून आलेल्या आहेत. भाजपामधील उमेदवारीवरून खेचाखेची झाली. माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, माजी नगरसेवक राजेंद्र शिळीमकर यांनी उमेदवारी मागितली होती. मात्र, पक्षाने मिसाळ यांना उमेदवारी घोषित केली. भिमाले यांची नाराजी दूर करण्यात पक्ष यशस्वी झाली. यासोबतच महाविकास आघाडीमध्ये देखील उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरू होती. काँग्रेसचे माजी गटनेते आबा बागूल यांनी यंदाही उमेदवारी मागितली होती. तसेच, शिवसेनेचे (उबाठा) बाळासाहेब ओसवाल, सचिन तावरे देखील इच्छुक होते. राष्ट्रवादी काँग्रेसकडून (शरदचंद्र पवार) स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा अश्विनी कदम यांनी उमेदवारी मागितली होती.

कदम यांनी २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत मिसाळ यांच्याविरुद्ध निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. पर्वतीची जागा महाविकास आघाडीत यंदाही राष्ट्रवादीच्या वाट्याला आल्याने कदम यांनाच उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे कदम यांनी कंबर कसली असून प्रचाराला सुरुवात देखील केली आहे. दरम्यान, अद्याप आबा बागूल हे नाराज आहेत. त्यांनी २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत देखील बागूल यांनी अपक्ष अर्ज दाखल केला होता. मात्र, पक्ष नेत्यांनी समजूत काढल्यानंतर त्यांनी अर्ज मागे घेतला होता. यावेळी देखील त्यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. परंतु, ते अर्ज मागे घेतात की अपक्ष लढतात याकडे लक्ष लागले आहे.

पर्वतीमध्ये आमदार माधुरी मिसाळ, राष्ट्रवादीच्या (शप) अश्विनी कदम आणि काँग्रेसचे बंडखोर उमेदवार आबा बागूल यांच्यात तिरंगी लढत होणार की बागूल माघार घेणार याबाबतचे चित्र ४ नोव्हेंबर रोजी स्पष्ट होईल. मात्र, याच धामधुमीत संपूर्ण मतदार संघात ठिकठिकाणी 'पर्वतीत आता सांगली पॅटर्न' असे फलक लागले आहेत. हे फलक नेमक्या कोणत्या नाराजाने लावलेत याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत. महाविकास आघाडीत देखील नाराज आहेत आणि महायुतीमध्ये देखील काही नाराज आहेत. त्यामुळे हा 'पॅटर्न' नेमका कोणाच्या पथ्यावर पडणार हे निकालाअंती स्पष्ट होईल.




### अनेक महिन्यापासून विधानसभेची तयारी

» पर्वती विधानसभा मतदारसंघातून महायुतीतील भाजपने विद्यमान आमदार माधुरी मिसाळ यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे. तर महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने माजी स्थायी समिती अध्यक्ष आश्विनी कदम यांना उमेदवारी दिली आहे. या मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक आबा बागूल हे अनेक महिन्यापासून विधानसभेची तयारी करत आहेत. या मतदारसंघातून ३० वर्षांहून अधिक काळ नगरसेवक म्हणून आबा बागुल हे निवडून आले आहे. आबा बागूल यांनी २००९ पासून काँग्रेस श्रेष्ठीकडे पक्षाकडे उमेदवारी मिळावी, यासाठी मागणी करित आले. पण प्रत्येक वेळी आबा बागुल यांना डावलण्यात आले. तर यंदा हा मतदारसंघ शरद पवार गटाला गेला. त्यामुळे आबा बागूल हे नाराज झाले. त्यावर त्यांनी पर्वती विधानसभा मतदारसंघातून अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला. या मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला.

### आबा बागूल यांची नाराजी दूर होणार ?

» पर्वती विधानसभा मतदारसंघातून विद्यमान आमदार माधुरी मिसाळ, शरद पवार गटाच्या अश्विनी कदम आणि काँग्रेस पक्षाचे बंडखोर उमेदवार आबा बागूल यांच्यात तिरंगी लढत होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ तारखेपर्यंत आहे. त्यामुळे सध्या तरी तिरंगी लढत म्हणावी लागेल, काँग्रेस पक्षाचे नेतेमंडळी आबा बागूल यांची नाराजी दूर करण्यात यशस्वी होतात का हे पहावे लागणार आहे.

# ऐन दिवाळीत प्रवाशांची लूट!

## वाहतूक पोलिसांमुळे पुणे रेल्वे स्टेशनवरील प्रीपेड रिक्षा बूथ बंद

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे रेल्वे स्थानकावरील प्रीपेड रिक्षा बूथ शुक्रवारी सायंकाळपासून बंद झाला. ऐन दिवाळीत यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. बूथ चालविणाऱ्या रिक्षा मित्रच्या कराराचे वाहतूक पोलिसांकडून नूतनीकरण न झाल्याने तो अखेर बंद झाला आहे. आचारसंहितेचे कारण पोलिसांनी यासाठी दिल्याचे समजते.

पुणे रेल्वे स्थानक परिसरात बेकायदा व्यवसाय करणारे रिक्षाचालक नागरिकांना अव्वाच्या सव्वा भाडे सांगून आर्थिक लूट करत होते. या प्रकाराला रिक्षामित्र प्रीपेड रिक्षा बूथच्या माध्यमातून चाप बसला होता. गेल्या १०० दिवसांत आत्तापर्यंत अंदाजे २८ हजार प्रवाशांनी बूथचा लाभ वापर केला. प्रवासी सेवा संघासोबत बूथ चालविण्यासाठी रिक्षामित्रने केलेले करार २२ ऑक्टोबरला संपुष्टात आला. त्यामुळे शुक्रवारी सायंकाळी ६ वाजल्यापासून हा बूथ बंद करण्यात आला. प्रवासी सेवा संघाने रिक्षा मित्रसोबत हा करार केला होता. या संघाचे अध्यक्षपद वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्तांकडे आहे.

याबाबत रिक्षामित्रचे डॉ. केशव क्षीरसागर म्हणाले की, या बूथची प्रायोगिक तत्वावरील मुदत संपली आहे. कराराचे नूतनीकरण न झाल्याने बूथ चालविणे शक्य होणार नाही. काही दिवस बूथ राहिल्यास तिथे प्रामाणिकपणे व्यवसायक करणाऱ्या रिक्षाचालकांना पुन्हा आणणे शक्य होणार नाही. स्थानिक गुंडांच्या विरोधाला न जुमानता १ हजार २११ रिक्षाचालकांनी प्रामाणिकपणे आणि नियमानुसार व्यवसाय करून सामान्य नागरिकांची होणारी लाखो रुपयांची लूट थांबविली.

रेल्वे स्थानकात रिक्षाचालक प्रवाशांची लूट करीत असल्याच्या तक्रारी वारंवार येतात. प्रीपेड रिक्षा बूथ सुरू झाल्यानंतर या तक्रारी कमी झाल्या होत्या. आता प्रवाशांकडून जास्त भाडे उकळण्याचे प्रकार सुरू झाले आहेत.




# केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर

## गिरीश सोनावणे, हेमंत पाटील, अंकुश चिंतामण यांना पदक जाहीर झाले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या इतिहासात सर्वात मोठ्या ५०० कोटी रुपयांच्या अपसंपदा बाळगल्याबाबतच्या खटल्याचा सर्वात जलद व सर्वोत्कृष्ट तपास केल्याबद्दल पोलीस निरीक्षक गिरीष सोनावणे, पुण्यामधून 'अह उल सुफा' या दहशतवादी संघटनेच्या दोन दहशतवाद्यांना पकडून देण्यात महत्वाची भूमिका बजावणारे कोथरूड पोलीस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक हेमंत पाटील आणि बिटकॉइन घोटाळा प्रकरणाचा उल्लेखनीय तपास करणारे पुणे सायबर पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक अंकुश चिंतामण या अधिकाऱ्यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर झाले आहे. राज्य पोलीस दलातील अकरा अधिकाऱ्यांना हे पदक जाहीर झाले आहे. सोनवणे यांना सर्वोत्कृष्ठ पुरस्कार जाहीर झाला आहे.

नगररचना विभागाचे निलंबित सहसंचालक हनुमंत नाझीरकरच्या ५०० कोटी रुपयांच्या खटल्यात ८ महिन्यात पहिले दोषारोपपत्र निरीक्षक सोनावणे यांनी दाखल केले होते. नाझीरकर याची उत्पन्नापेक्षा ११६२ टक्के अधिक मालमत्ता आढळली आहे. त्याच्या २० बेनामी मालमत्ता सुरुवातीला उघड झाल्या असून त्यात नंतर अधिक भर पडली होती. नाझीरकर याच्या ३८ बेनामी कंपन्या आणि त्यात गुंतविलेला पैसा याचा अतिशय गुंतागुंतीचा हा तपास होता. सोनावणे यांनी पुणे शहर पोलीस दलात २०१२ ते २०१९ या काळात फरासखाना पोलीस ठाणे, सिंहगड रोड पोलीस ठाणे, गुन्हे शाखा येथे काम पाहिले आहे. त्यानंतर २०१९ ते २०२३ दरम्यान लाच लुचपत प्रतिबंधक विभागात ते कार्यरत होते.



# पहिल्या दिवशी एकही अर्ज माघारी नाही

## मतदारसंघांत 82 उमेदवार कायम : सोमवारी अर्ज माघारीचा अखेरचा दिवस

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी, चिंचवड, भोसरी विधानसभा मतदारसंघात अर्ज माघारी घेण्याच्या पहिल्या दिवशी, गुरुवारी (दि.31) एकानेही उमेदवारीअर्ज मागे घेतला नाही. त्यामुळे 82 उमेदवार कायम आहेत. सोमवारी(दि. 4) अर्ज माघारीचा अखेरचा दिवस आहे. त्यानंतर लढतीचे चित्र स्पष्ट होईल. शनिवार(दि.2) आणि रविवारी(दि.3) निवडणूक कार्यालयास सुटी असल्याने अर्ज माघारीसाठी शुक्रवार(दि.1) आणि सोमवार(दि.4) असे दोनच दिवस शिल्लक आहेत.



उमेदवारी अर्जांची छाननी झाल्यानंतर पिंपरी मतदारसंघात 36, चिंचवडमध्ये 28 आणि भोसरीत 18 जणांचे उमेदवारी अर्ज राहिले आहेत. अर्ज माघारीच्या पहिल्या दिवशी एकाही उमेदवाराने अर्ज मागे घेतला नाही. सोमवारी अर्ज माघारीची मुदत संपल्यानंतर चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर खर्याअर्थाने प्रचारास सुरुवात होईल. अर्ज माघारीत गोंधळ होऊ नये, यासाठी निवडणूक कार्यालयाच्या आवारात पोलिस बंदोबस्तात वाढविण्यात आला आहे.

### पिंपरी मतदारसंघ : एकूण 36 उमेदवार

अण्णा बनसोडे (राष्ट्रवादी काँग्रेस), सुलक्षणा धर (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष), मनोज गरबडे (वंचित बहुजन आघाडी), सुंदर कांबळे (बहुजन समाज पार्टी), बाळासाहेब ओव्हाळ (महाराष्ट्र स्वराज्य पक्ष-भाजपा बंडखोर), ॲड. गौतम चाबुकस्वार (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष बंडखोर), चंद्रकांता सोनकांबळे (आरपीआय बंडखोर), काळुराम पवार (राष्ट्रवादी काँग्रेस बंडखोर), मयूर जाधव (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार बंडखोर), जितेंद्र ननावरे (शिवसेना बंडखोर), चंद्रकांत लोंढे, मनोज कांबळे (दोघे काँग्रेस बंडखोर), दीपक रोकडे, स्वप्नील कांबळे, राजेंद्र छाजछिडक, नवनाथ शिंदे, बाबासाहेब कांबळे, भिकाराम कांबळे, राहुल सोनावणे, सचिन सोनवणे, ॲड. गौतम कुडुक , सुरेश भिसे, ॲड. सुधीर कांबळे, सुरेश लोंढे, मीनल यादव खिलारे, प्रल्हाद कांबळे, हेमंत मोरे, कृष्णा कुडुक, जफर चौधरी, मुकंद ओव्हाळ, नरसिंग कटके, राजू भालेराव, दादाराव कांबळे, सुधीर जगताप, कैलास खुडे, रिता सोनवणे, (सर्व अपक्ष)

### चिंचवड मतदारसंघ : एकूण 28 उमेदवार

शंकर जगताप (भाजपा), राहुल कलाटे (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष), भाऊसाहेब भोईर (पिंपरी-चिंचवड परिवर्तन आघाडी), नाना काटे, शिवाजी पाडुळे (तिघे राष्ट्रवादी काँग्रेस बंडखोर), मारुती भापकर, संदीप चिंचवडे, रफिक कुरेशी, सचिन सोनकांबळे, सचिन सिद्धे, अतुल समर्थ, ॲड. अनिल सोनवणे, सतीश काळे, राजेंद्र काटे, विनायक ओव्हाळ, रुपेश शिंदे, रविंद्र पारधे, धर्मराज बनसोडे, भरत महानवर, अरुण पवार, मयूर घोडके, सिद्धिक शेख, जावेद शेख, करण गाडे, जितेंद्र मोटे, सीमा यादव, राजेंद्र गायकवाड, राजेंद्र पवार (सर्व अपक्ष)

### भोसरी मतदारसंघ : एकूण 18 उमेदवार

महेश लांडगे (भाजपा), अजित गव्हाणे (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष), रवी लांडगे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष बंडखोर), बलराज कटके (बहुजन समाज पार्टी), अमजद खान (एमआयएम), संतोष लांडगे, शलाका कोंडावार, अरुण पवार, हरेश डोळस, जावेद शहा, गोविंद चुनचुने, सुभाष वाघमारे, खुदबुद्दीन होबळे, रफीक कुरेशी, सूरज गायकवाड, रामा ठोके, दत्तात्रय जगताप, परमेश्वर बुर्ले (सर्व अपक्ष).

### बंडोबांचे बंड थंड करण्याचे निकराचे प्रयत्न

**» उमेदवारांना माघारीसाठी येत्या सोमवारपर्यंत (दि. 4) मुदत आहे. बंडोबांचे बंड शमविण्याचे निकराने प्रयत्न सुरू झाले आहेत. दिवाळीचा सण बाजूला सारून पदाधिकारी या कामातच व्यस्त झाले आहेत. अधिकृत उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींकडून बंडखोरांची समजूत काढली जात आहे. वरिष्ठ नेतेमंडळी फोन करून अर्ज माघारी घेण्यासाठी सूचना देत आहेत. तसेच, काही ठिकाणी पुनवर्सन करण्याचे आश्वासन दिले जात आहे. पिंपरी, चिंचवड व भोसरी मतदारसंघांतील लढतीचे चित्र येत्या सोमवारी स्पष्ट होईल.**

# दिवाळीनिमित्त वैयक्तिक भेटीवर राहुल कलाटे यांचा भर

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते व मतदारांसोबत संवाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

सर्वत्र दिवाळीची धामधूम, उत्साह व आनंदाचे वातावरण आहे. मात्र राजकीय चर्चा मतदारसंघातील नेत्यांभोवती सुरु असताना महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांनी दिवाळी निमित्त मतदार आणि मतदारसंघातील जुन्या जाणत्या नागरिकांच्या सदिच्छा भेटीपासून प्रचाराची सुरुवात केली आहे.



चिंचवड मतदारसंघात स्थानिक आणि नोकरी उद्योगासाठी बाहेरून येऊन स्थायिक झालेल्या नागरिक एकत्र राहतात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मतदार आणि जुने अनेक कार्यकर्ते इथे आहेत. पक्षात फूट पडल्यानंतर कार्यकर्ते आणि मतदार बहुंसख्येने शरद पवार यांच्यासोबत आहेत. त्यामुळे कलाटे यांनी कार्यकर्ते, पक्षाचे मतदारसंघातील जुने जाणते, मतदार यांच्या भेटी गाठी घेत संवाद साधण्यावर भर दिला. सर्वांना भेटून दिवाळीच्या शुभेच्छाही दिल्या.

कलाटे यांनी गुरुवारी (ता. ३१) पायाला भिंगरी लावत पंचक्रोशीतील विविध गावांचा वेगवान दौरा केला. गाठीभेटी व बैठकांचा धडाका लावत सर्वांशी हितगुज केले. जुन्या जाणत्या ग्रामस्थांचे मार्गदर्शन घेतले. रहाटणी, पूनावळे, थेरगाव, वाकड, चिंचवड आदी गावातील ग्रामदैवतांचे दर्शन घेऊन त्यांनी स्थानिक मतदार आणि कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी केल्या.

ज्येष्ठ नेते माजी खासदार विदुरा तथा नाना नवले यांचीही त्यांनी भेट घेऊन मार्गदर्शन व आशीर्वाद घेतले. सकाळी लवकर सुरू केलेल्या या भेटीगाठी दरम्यान त्यांचे जागोजागो जल्लोषात स्वागत झाले. सुहासिनींनी औक्षण केले, पेढे भरवून स्वागत करण्यात आले. यावेळी चिंचवड विधानसभेचा आश्वासक आणि चौफेर विकास साधण्यावर कलाटे यांनी भाष्य केले.

“ दिवाळीचा शुभ उत्सव सुरू झालेला आहे. सर्वांना शुभेच्छा दिल्या. आज भेटीगाठीवर भर दिला आहे. चिंचवडच्या पुढच्या ५० वर्षांचा विचार करून सुनियोजित विकासाचा आमचा संकल्प आहे. भूमीपुत्र म्हणून मला परिसराची संपूर्ण माहिती आहे. नगरसेवक म्हणून मी योग्य विकासकामे करून दाखवली आहेत. भूमीपुत्रांना न्याय मिळवून देत इथे येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला जागतिक दर्जाच्या सुविधा मिळाव्यात यासाठी सुनियोजित विकासाची आवश्यकता आहे. त्यासाठी काम करण्याचा माझा संकल्प आहे.

**- राहुल कलाटे, उमेदवार महाविकास आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष.**

“ आमचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली उच्चशिक्षित व अभ्यासू नेतृत्व असलेले राहुल कलाटे हे चिंचवडचा सूनियोजित व आश्वासक विकास साधतील. कलाटे हे सर्वसामान्यांचे व तळमळीचे नेते आहेत. त्यांची प्रशासनावर मजबूत पकड आहे. त्यामुळे अशा अष्टपैलू नेत्याच्या हातात चिंचवड विधानसभेचा कारभार द्यायला जनता उत्सुक आहे. त्यांचा विजय निश्चित आहे.

**- मच्छिन्द्र तापकीर, माजी नगरसेवक तथा ज्येष्ठ नेते राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष.**

# पालिकेच्या नोकरीला 71 जणांनी केला रामराम

## पालिकेत कायमस्वरुपी असलेल्या 13 कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती (व्हीआरएस) घेतली

**पुणे | प्रतिनिधी**

सरकारी कामाची बदलती पद्धती, कामाचा व्याप, काम करताना होणारा मानसिक त्रास यामुळे गेल्या वर्षभरात ७१ जणांनी पालिकेच्या नोकरीला रामराम ठोकल्याचे समोर आले आहे. तर, पालिकेत कायमस्वरूपी असलेल्या १३ कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती (व्हीआरएस) घेतली आहे. दोन वर्षांपूर्वी पालिकेत नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून इतर ठिकाणी चांगल्या पदावर संधी मिळाल्याने त्यांनी पालिकेची सेवा सोडली असल्याचा दावा पालिका प्रशासनाकडून केला जात आहे.



पुणे महापालिकेत नोकरभरतीचा वाद न्यायालयात असल्याने, तसेच पालिकेची सेवा प्रवेश नियमावलीला अंतिम मान्यता न मिळाल्याने गेली दहा ते बारा वर्षे पालिकेत कोणत्याही पदावर भरती झालेली नव्हती. गेल्या दहा ते बारा वर्षांमध्ये पालिकेतून अनेक कर्मचारी सेवानिवृत्त झाले. मात्र, भरती प्रक्रियेवर बंदी असल्याने पालिकेने कंत्राटी पद्धतीने पदे भरून कामे सुरू ठेवली होती.

राज्य सरकारने नोकरभरतीवरील स्थगिती उठविल्याने २०२२ मध्ये पुणे महापालिकेने १३५ कनिष्ठ अभियंत्यांसह विविध पदांसाठी ४४८ जणांची भरती प्रक्रिया राबविली. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात ३२० जागांची भरती प्रक्रिया पूर्ण केली. या दोन टप्प्यांत आत्तापर्यंत पालिकेने सुमारे ८०८ पदांची भरती केली आहे.

**पदाचे नाव – राजीनामा दिलेल्यांची संख्या**

- » लिपिक – ३७
- » कनिष्ठ अभियंता – १०
- » सहायक अतिक्रमण निरीक्षक – ०९
- » फायरमन – ०८
- » विभागीय वैद्यकीय अधिकारी – ०३
- » औषध निर्माता – ०२
- » वाहन निरीक्षक – ०२
- » आतापर्यंतची स्वेच्छानिवृत्ती – १३

यातील लिपिक, कनिष्ठ अभियंता, फायरमन, सहायक अतिक्रमण निरीक्षक, विभागीय वैद्यकीय अधिकारी यांसह अन्य काही पदांवरील ७१ जणांनी राजीनामा दिला आहे. त्यामुळे आता या जागा रिक्त झाल्या आहेत.

पालिकेत काम करताना होणारा त्रास, माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधींकडून टाकला जाणारा दबाव, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून होणारा मानसिक त्रास यामुळे आरोग्यावर परिणाम होत असल्याचे कारण पुढे करून राजीनामे देण्यात आल्याची चर्चा पालिकेत सुरू आहे. मात्र, हे कर्मचारी स्पर्धा परीक्षा देऊन पालिकेच्या सेवेत दाखल झाले होते. त्यांना इतर काही ठिकाणांवरून पालिकेपेक्षा अधिक चांगल्या प्रकारची नोकरीची संधी मिळाल्याने त्यांनी राजीनामा दिला असल्याचे पालिकेच्या प्रशासन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# ऐन दिवाळीत राहावे लागणार उपाशी

## संपामुळे स्विगी, झोमॅटोसह इतर ऑनलाइन डिलिव्हरी सेवा ठप्प होणार : गिग कामगारांच्या मागण्या काय?

**पुणे | प्रतिनिधी**

विविध क्षेत्रात सेवा देणाऱ्या ऑनलाइन मंचावरील गिग कामगारांनी काल गुरुवारी दि. ३१ रोजी संप पुकारला. गिग कामगार आपला मोबाईल बंद करून डिजिटल शांतता पाळून काळी दिवाळी साजरी करणार आहेत. गिग कामगारांच्या या संपामुळे ऐन दिवाळीत ग्राहकांची मोठी गैरसोय होणार आहे.



द गिग अँड प्लॅटफॉर्म सर्व्हिसेस वर्कर्स या देशातील पहिल्या महिला गिग कामगारांच्या संघटनेने ही संपाची हाक दिली आहे. हा संप देशभरात पुकारण्यात आला असून, त्यात महाराष्ट्रातील १० ते १५ हजार गिग कामगार सहभागी होण्याची शक्यता आहे. राज्यातील मुंबई आणि पुण्यासह प्रमुख शहरांत हे गिग कामगार गुरुवारी काम बंद करणार असल्याने नागरिकांना ऑनलाइन मंचांच्या माध्यमातून मिळणाऱ्या सेवा मिळणार नाहीत. ओला, स्विगी, झोमॅटो, अर्बन कंपनीसह अनेक ऑनलाइन मंचाचे गिग कामगार या संपात सहभागी होतील.

या आंदोलनाबाबत संघटनेच्या महाराष्ट्र उपाध्यक्षा नीशा पवार म्हणाल्या की, गिग कामगारांना त्यांचे मूलभूत हक्क डावलले जातात. त्यांना किमान वेतन, आरोग्य आणि सुरक्षा या गोष्टी मिळायला हव्यात. कंपन्यांकडून गिग कामगारांवर अनेक अटी लादल्या जात आहेत. यात गिग कामगार भरडले आहेत. गिग कामगारांना अनेक वेळा अन्यायी आणि भेदभावाची वागणूक दिली जाते. त्यांना हिंसाचाराचा सामना करावा लागल्याचीही काही प्रकरणे घडली आहेत. त्यामुळे गिग कामगारांना न्याय मिळावा, यासाठी हे आंदोलन करण्यात येत आहे.

### सरकारी योजनांचा लाभ मिळावा

गिग कामगारांना कंपन्यांतील इतर कामगारांप्रमाणे मान्यता मिळावी, अशी संघटनेची प्रमुख मागणी आहे. गिग कामगारांना मान्यता मिळाल्यास त्यांना इतर कामगारांप्रमाणे सर्व सुविधा कंपनीकडून उपलब्ध होतील. त्यात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, निवृत्तिवेतन योजना, कर्मचारी विमा योजनेसह इतर सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ गिग कामगारांना मिळू शकेल, असे संघटनेचे म्हणणे आहे.

**गिग कामगारांच्या मागण्या**

- » कंपन्यांनी कामगारांसाठीच्या जाचक अटी रद्द कराव्यात.
- » कंपन्यांनी किमान वेतनाची हमी द्यावी.
- » कामगारांना कामासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे.
- » कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षेसाठी उपाययोजना करणे.
- » कंपन्यांनी पारदर्शक कार्यपद्धती राबवावी.
- » सरकारने ऑनलाइन कंपन्यांसाठी नियामक चौकट आखावी.

